D:\APA 1 backup (2016 to 2020)\APA-2022\Letter 2022.doc


# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ

## कृषि नगर, वसमत रोड, परभणी - ४३१ ४०२ (महाराष्ट्र)

| ई-मेल | : reg_mau@rediffmail.com | दूरध्वनी | : (०२४५२) २२९७५५ |
|---|---|---|---|
| वेबसाईट | : www.vnmkv.nic.in | फॅक्स | : (०२४५२) २२९७५५, २२३५८२ |


**वाचा :** १. कृषि व पदूम विभागाचा शासन निर्णय क्रमांक एयूजी-३७१९/सीआर-४१/६-ए दिनांक १२.०८.२०२२

२. कृषि व पदूम विभागाचा शासन निर्णय क्रमांक एयूजी-३७२१/सीआर-१५०/६-ए दिनांक १९.०९.२०२२

३. नियंत्रक वनामकृवि परभणी यांचे परिपत्रक सीएफसी/वेतनपडताळणी/१९९९/२०२२ दिनांक ११.१०.२०२२

# विद्यापीठ परिपत्रक

क्रमांक २०२२/वेतन पडताळनी/ प्र.क्र.१२६०/आस्था-१ /15330

कुलसचिव कार्यालय, वनामकृवि, परभणी

दिनांक २३.१२.२०२२

संदर्भ क्र.3 वरील नियंत्रक कार्यालयाच्या परिपत्रकानुसार विद्यापीठातील कार्यरत आणि दिनांक १.१.२०१६ नंतर सेवा निवृत्त झालेल्या शिक्षकवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांचे सातव्या वेतन आयोगानुसार वेतननिश्चिती संदर्भात मार्गदर्शन सूचना निर्गमित केल्या आहेत. सदर सुचनापैकी सूचना क्र.४ मध्ये शासन निर्णय दिनांक १२/०८/२०२१ मधील मुद्दा क्रमांक २१ अन्वये उपरोक्त कर्मचाऱ्यांची नियुक्ती ही संबंधीत पदावर कायदेशीर दृष्टया करण्यात आलेली असल्याबाबत नियुक्ती प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र घेण्याबाबत सूचित केले आहे.

त्याअनुषंगाने वेतनपडताळणी करिता कर्मचाऱ्यांची नियुक्ती कायदेशीर दृष्टया करण्यात आलेली असल्याबाबत नियुक्ती प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र घेण्याकरिता मोठ्या प्रमाणावर प्रस्ताव /विनंती अर्ज प्राप्त होत आहेत. त्याअनुषंगाने सूचना निर्गमित करण्याची बाब विचाराधीन होती.

तेव्हा विद्यापीठातील सर्व शिक्षक वर्गीय अधिकारी/ कर्मचारी यांची नियुक्ती कायदेशीर दृष्टया करण्यात आलेली असल्याबाबत नियुक्ती प्राधिकारी यांचे परिवीक्षाधीन कालावधी पूर्ण केल्याबाबतचे आदेश/ स्थायित्व प्रमाणपत्र वेतननिश्चितीची पडताळणी करण्याकरीताच्या प्रस्तावासोबत जोडण्यात यावे. तसेच ज्या अधिकाऱ्याची पदोन्नतीने नियुक्ती झाली असेल त्यांनी त्यांच्या पदोन्नतीपूर्वी कार्यरत असलेल्या सरळसेवेच्या पदाचा परिवीक्षाधीन कालावधी पूर्ण केल्याबाबतचे आदेश/ स्थायित्व प्रमाणपत्र प्रस्तावासोबत जोडून नियंत्रक कार्यालयास वेतन निश्चितीचा प्रस्ताव सादर करावा.

**मा.कुलगुरू महोदय यांच्या मान्यतेने,**

(धिरजकुमार रा. कदम)

**कुलसचिव**

**प्रत :**

1. संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि)/ संचालक संशोधन /संचालक विस्तार शिक्षण,वनामकृवि, परभणी यांना देऊन कळविण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या अधिनस्त सर्व कार्यालय प्रमुखांच्या निदर्शनास आणून द्यावे.
२. नियंत्रक / पूर्व लेखा परिक्षण अधिकारी, वनामकृवि, परभणी यांना महितीस्तव
३. प्रभारी अधिकारी, मध्यवर्ती संगणक केंद्र,वनामकृवि, परभणी यांना देवून निर्देशीत करण्यात येते की, सदर परिपत्रक व संलग्न केलेले प्रपत्रे विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.
४. मा.कुलगुरू यांचे खाजगी सचिव, वनामकृवि, परभणी